# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २५/०३/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत ०.५ मौजा गो विज्ञान केंद्र देवलापार येथे दिनांक २४/०३/२०२२ चे ०४.०० वा. ते ०५.०० वा. दरम्यान एमएच–२०/ बिसी– ७७८२ क्रमांकाचा झायलो गाडीचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहनामध्ये ४ गाई व ३ बैल असे एकुण ७ जनावरांना आखुड दोरखंडाने करकरचुन बांधुन कतली करिता भरधाव वेगाने घेवुन जात असतांना सर्वीस रोडच्या गडयामध्ये गाडी पलटी झाली. गाडी चालक मोक्यावरून फरार झाला घटना स्थळावरून ५ जिवत जनावारे किमती ५०,०००/–रू २ मरण पावलेले व १ एमएच–२०/ बिसी– ७७८२ क्रमांकाचा झायलो गाडी किमती ८,००,०००/–रू. व दोरखंड किमती ३००/–रू. असा एकुण कि. ८,५०,३००/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार राकेश नलगुंडवार, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(A)(B)(F)(M)(I) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(म),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ४२९ भादवी तसेच १८४ मोवाका काद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास प्रविण बोरकुटे मो.नं ९५४५६६७२२३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर